# मी, माझे जीवन आनंदी कसे केले,त्याची गोष्ट

प्रकाशित:


**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ



**© पुनरारंभ**



**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# मी, माझे जीवन आनंदी कसे केले,त्याची गोष्ट

खरेतर जीवनात सुख दुःख हे प्रत्येकालाच लागू आहे. सुख दुःख हे जीवनाचा एक अनिवार्य भागच असे म्हणावयास हरकत नाही. याशिवाय जीवन परिपूर्ण होउच शकत नाही. रामदासांनी आपल्या मनाच्या श्लोकात म्हटलेच आहे “ जगी सर्व सूखी असा कोण आहे, विचारी मना तुची शोधून पाहे.” संतांनी देखिल म्हटले आहे “सुख पाहता जवापाडे ,दुःख पर्वता एवढे.” जगात सुखी माणूस शोधून देखील सापडणार नाही. कदाचित यावरूनच सुखी माणसाचा सदरा ही गोष्ट तयार झाली असावी. याला मी तरी कसा अपवाद असणार. समाजात मजसमान अनेक दुःखी कष्टी व्यक्ती आहेत. त्यांचे दुःखी जीवन, त्यांनी भोगलेल्या व भोगत असलेल्या हाल अपेष्टा, त्यांच्या नशिबातील भोग पाहिल्यास मी स्वतःला अनंत पटीने सुखी समजेन. मला तरी वाटते की, दुःख दुःख म्हणून रडत कढत जीवन जगण्या पेक्षा दुःखातच सुख शोधित आनंदाने जीवन जगायचे व जीवन सुखी करायचे असते.

स्वअनुभवा बाबतीत सांगावयाचे झाल्यास, बालपण जस जसे मागे पडत गेले व वय वाढत गेले तस तसे सर्वसाधारण सामान्य माणसा प्रमाणेच मी पण भावी जीवनाची सुख स्वप्ने पाहात, ती रंगवीत मोठा झालो. त्यावेळी नोकरी लागणे म्हणजे फार मोठे दिव्यच होते. कर्म धर्म संयोगाने नशिबाने मला साथ दिली. वयाच्या १८व्या वर्षीच नोकरीला लागलो. त्यावेळी मिळणा–या तुटपुंज्या तीन आकडी पगारातच स्वतःचा घरखर्च, गावी आई वडिलांना करावयाची मदत, कधीकाळी उदभवणारे आजारपण या व्यतिरिक्त भविष्या साठी थोडीशी बचत इ.खर्च पाहता महिना आर्थि कदृष्टया प्रचंड ताण तणावाखाली पार होत असे. अशाप्रकारे सर्व खर्च वजा जाता महिना पार करणे म्हणजे मोठे दिव्यच होते. महिना अखेरीस शेवटच्या आठवडयात तर फारच कुचंबणा व्हायची. बरोबरीचे सर्व सहकारी मित्रांची आर्थिक परिस्थीती पण मज समान यथा तथाच असल्यामुळे कोणाकडे याचना करणे पण योग्य नव्हते. यावर कोणी मदत केलीच तर, परत फेडीचा प्रश्न पण मोठा.

कालांतराने उपाय सुचत गेले. दिनदर्शिकेचे पान उलटावे तसे दिवस पलटले. सुरवातीला ऑफिसमध्येच कामाचा व्याप वाढल्यामुळे संध्याकाळी ताशी तीन रूपया प्रमाणे ओव्हरटाईम मिळत गेला. महिन्याकाठी पंचवीस तीस तास काम झाले की महिन्याला पंचाहत्तर ते नव्वद रूपयापर्यंतचा आर्थिक हातभार लागत गेला. स्वार्थ परमार्थ साधत वसाहतीतील मुलांच्या शिकवण्या घेउन काही अर्थार्जन केले. पत्नी सौ.रजनीने पोस्टाची महिला एजन्ट तसेच एका सहकारी बॅंकेची दैनंदिन ठेव

योजनेसाठी एजन्टची कामे करून संसारास हातभार लावला. दरम्यान पोस्टाव्दारे मुक्तविद्यापिठाचा बालवाडीचा कोर्स करून खाजगी शाळे मध्ये बालवाडी शिक्षिकेची नोकरी केली. वसाहती मध्येच राहत्या घरी शालेय साहित्याची विक्री करून चार पैसे मिळविले. अशा एक ना अनेक विध प्रकारे तुटपुंज्या प्रकाराचा बाउ न करता संसाराचा गाडा सुरळीत चालविला.

पुढे नशिबाने साथ दिली. लिपिक पदापासून सेवानिवृत्ती पर्यत अधिकारी पदापर्यंत पदोन्नती होत गेली. पदोन्नती मुळे पगारामध्येही वाढ होत गेली. सन २००४ मध्ये केलेल्या सेवेचा आनंद घेत आनंदाने स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली.

यादरम्यान आमचा संसार बहरास आला. राम लक्ष्मण रूपी सदगुणी रितेश व निलेश या पुत्रांनी पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. दोघांना ब-यापैकी जॉब मिळाले. कर्तव्य भावनेने दोघांचे विवाह केले. आपल्या कुवतीप्रमाणे व गरजेप्रमाणे पुण्यातच सदनिका खरेदी करून दोघे स्वतंत्ररित्या आपल्या संसारात रमलीत. त्यांचा संसार फुलला. वेलीवर फुल फुलले. मानवी मन फार लोभी आहे. सर्व काही असले तरी लोभ पिच्छा सोडत नाही. स्वभावधर्माप्रमाणे आमचा नातवावर व नातवाचा आमच्यावर जीव जडला. ओढ वाढत गेली. सर्वानी एकत्र राहावे स्वतः जीवनाचा आनंद घ्यावा व इतरांना पण आनंद देउन सुखी करावे ही प्रामाणिक इच्छा. पण सद्यस्थितीतील युवक युवतींची बदललेली मानसिकता, काळाची गरज किंवा अन्य अनेक कारणांमुळे निर्माण झालेल्या विभक्तकुटुंब पध्दतीमुळे मुले, सुना व नातवाची भेट होणे दुरापास्त होत गेले. 'घरोघरी मातीच्या चुली' या उक्तीप्रमाणे प्रसंगी कुटुंबात छोटेमोठे वाद विवाद घडले. वाद अधिक टोकास जाउ नयेत याची काळजी घेत सामंजस्याची भुमिका घेउन मनावर नियंत्रण ठेवत प्रसंग हाताळले. महिन्यातून एकाद वेळा सर्वा ंच्या भेटी होतात. तोच दिवस आनंदी दिवस समजून त्यावेळी मिळालेला आनंद पुढील भेटीपर्यंत टिकून ठेवला जातो.

निवृत्तीनंतर वाढत्या वयाचा विचार करता केवळ योगा समान शारीरीक व्यायाम, संतुलित व योग्य आहाराचा आधार घेत सुखी जीवन जगण्या बरोबरच, चांगले मानसिक, कौटुंबिक व सामाजिक स्वास्थ्य देखिल तितकेच महत्वाचे आहे. याची जाण ठेवत निवृत्तीनंतर रोज फिरावयास जाणे या सारख्या शारीरीक व्यायामबरोबरच, सेवेमध्ये असतांना वेळेअभावी अपूर्ण राहिलेले लिखाणाचे स्वप्न पूर्ण करण्याकडे कल देत कथा, कविता व लेख या सारखे लिखाण करून मानसिक व बौध्दीक स्वास्थ्य चांगले ठेवण्याचा प्रयत्न करित आहे. पहिल्या पासून थोडीशी समाजसेवेची आवड असल्यामुळे जमेल तसे समाज कार्यात सहभाग घेउन सामाजिक स्वास्थ पण टिकविण्याच्या प्रयत्नात आहे. द्रव्याचा लोभ

न करता ‘ठेविले अनंते तैसेची रहावे’ या सृजन वाक्यातील अर्थाप्रमाणे उपलब्ध द्रव्यात समाधानी आहे. कौटुंबिक जिवनात कुटुंबियांशी वेळेनुरूप आवश्यक तेवढाच विरोध दर्शवित प्रसंगी सामंजस्याची, प्रेमाची, सलोख्याची वर्तणुक देउन समतोल राखण्याच्या प्रयत्नात आहे.

संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात ‘इवलेसे रोप लावीयले व्दारी, वेलू तयाचा गेला गगनावरी’ याप्रमाणे वयाची साठी उलटून ६३कडे वाटचाल सुरू आहे. या जीवन प्रवासात अनेक सुख दुःखाचे प्रसंग पाहिलेत, अनुभवलेत. सुखामध्ये सुख भोगले तर दुःखामध्ये पत्नीच्या सहकार्याने व सहयोगाने कठिण प्रसंगांवर मात केली.

माझ्या या सुखमय आयुष्या मध्ये तिचा पण फार मोठा मोलाचा वाटा आहे. रितेश व निलेश पुत्रांनी कोणत्याही प्रकारे कधी हट्ट न करता परिस्थतीची जाण ठेवत परिस्थितीशी जुळवून घेउन शिक्षण पूर्ण केले. माता पितांवर कोणतेही ओझे न टाकता स्वतःच्या पायावर उभे राहिलेत. ही आमच्या दृष्टीने फार मोठी अभिमानाची बाब आहे.

संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज देवा पुढे प्रसाद मागतांना पसायदानामध्ये म्हणतात ‘ जो जे वांछिल तो ते लाभो प्राणिज्यात’ हीच इच्छा मी प्रकट करित परमेश्वरास प्रार्थना करेन ‘सर्वेत्र सुखी न संतु ।
सर्वे संतु निरामया ।सर्वे भद्राणीपश्यंतु माः कश्चीत दुःख ना भवेत.’

श्री

दि. २९.०४.१३.

श्री.पवन कुलकर्णी. यास स.न.

मी रत्नाकर वाणी. १९७१ साली पुणे जिह्यात, जुन्नर तालुक्यातील आर्वी शाखा, येथे तत्कालीन विदेश संचार सेवा मध्ये येथे निम्न श्रेणी लिपीक या पदापासून माझ्या करिअरला सुरवात झाली. पदोन्नती व्दारे निम्न श्रेणी लिपीक, उच्च श्रेणी लिपीक, प्रधान लिपीक, कार्यालय अधिक्षक, अधिकारी अशा विविध पदांवर आर्वी,पुणे व उत्तर प्रदेशात देहरादून शाखेमध्ये एकूण ३४ वर्षे सेवा झाल्यावर, २००४ मध्ये तत्कालीन विदेश संचार सेवा/विदेश संचार निगम लि.तथा हल्लीचे टाटा कम्युनिकेशन्स, पुणे येथून अधिकारी(मा.सं.)या पदावरून सेवा निवृत्त झालो. निवृत्तीपश्चात मी पुण्यास खराडी येथे स्थायिक झालो आहे.

सेवेत असल्यापासूनच मला विविध प्रकारचे लिखाण करणे व वाचनाची आवड आहे. पण वेळेअभावी तो छंद मी मनापासून पूर्ण वेळ देत जोपासू शकलो नाही. आता सेवानिवृत्तीनंतर बराचसा वेळ उपलब्ध झाल्यामुळे माझ्या या छंदास गती प्राप्त झाली. हे करत असतांनाच एके दिवशी दुपारी सहजच पडल्या पडल्या घडयाळा कडे नजर गेली. घडयाळातील काटे फिरत असल्याचे पाहून कविता सुचली.

‘घडयाळाचे काटे स्वतःभोवती फिरतात
पळभर विश्रांती, थोडा थांबा हे शब्द त्यांचे गावीच नसतात |धृ.|

अशी ही माझी चार कडव्यांची कविता मला स्वतःला व इतरांना पण आवडली. तेव्हा पासून मला कविता करण्याचा पण छंद लागला.माझ्या अशा अनेक कविता अजून अप्रकाशित आहेत. निवृत्ती नंतर मी नाकारलेली बायको, कमळा, आईची शिकवण, आशिर्वाद, दिनू, गोड गुपित, माहेरचा सुगंध, पेरूवाल्याची पोर, योगायोग, गळतीची पानं, धाडस, जागरण, लडिवाळा अशा अनेक मराठी कथा लिहिल्यात. धाडस, जागरण, लडिवाळा या नुकत्याच लिहिलेल्या कथा सोडता सर्व कथा विविध दिवाळी अंकांमधून व दर महिन्यास प्रकाशित होणा–या मासिकांमधून प्रकाशित झाल्या आहेत. त्याच प्रमाणे नातीगोती, सावर रे, महिलांचे २१व्या शतकातील स्थान, आनंदी दिवस, मुंबईचा भिकारी, हसावे

की रडावे, मीच माझा झाले चोर असे अनेक स्वअनुभवावर आधारित व बोधप्रद लघुलेख देखिल प्रकाशित झाले आहेत. मला समाज सेवेची देखिल आवड आहे.

स्वतःबद्दल फार सांगणे नाही पण यथावकाश उभयतांच्या सवडीनुसार भेटीची इच्छा आहे.

धन्यवाद,

आर.जी.वाणी